## पालघर पोलीस शिपाई (नि:शस्त्र) भरती-२०१९

१. पालघर पोलीस शिपाई (नि:शस्त्र) भरती-२०१९ करिता लेखी परिक्षा दिनांक १८/१०/२०२१ रोजी घेण्यात आली असुन सदर परिक्षेची उत्तरतालिका प्रश्नसंच निहाय (A,B,C,D) दिनांक १८/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती व त्यावर प्राप्त आक्षेपांची छाननी करुन व उचित बदल करुन दिनांक १९/१०/२०२१ रोजी सुधारित उत्तरतालिका संचनिहाय (A,B,C,D) प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. सदर सुधारित उत्तरतालिकेनुसार लेखी परिक्षेमध्ये सर्व हजर उमेदवारांना प्राप्त झालेले गुणांचा तक्ता या सोबत जाहीर करण्यात आला आहे.

३. सदर गुणतक्ता हा गुणवत्ता यादी नसून सर्व हजर उमेदवारांना लेखी परिक्षेत प्राप्त झालेली गुणांची यादी आहे.

४. उमेदवारांना प्राप्त गुणांबाबत काही आक्षेप असल्यास त्यांनी लेखी अर्ज OMR उत्तरपत्रिका व इतर पुरावे यांच्यासह दिनांक २०/१०/२०२१ रोजीचे सायंकाळी २१.०० वा. पर्यत पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर, कोळगांव येथे प्रत्यक्ष येवून अथवा **sp.palghar@mahapolice.gov.in** या मेल- आयडीवर स्कॅन करुन सादर करावा. त्यानंतर येणाऱ्या आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. इतर मार्गाने प्राप्त आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही.

५. लेखी परिक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षण निहाय १:१० प्रमाणातील यादी लवकरच **www.mahapolice.gov.in, www.palgharpolice.gov.in** या संकेतस्थळांवर जाहीर करण्यात येईल.

६. त्यानंतर पात्र उमेदवारांची कागदपत्र पडताळणी व शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक स्वतंत्ररित्या लवकरच जाहीर करण्यात येईल. यास्तव उमेदवारांनी वर नमुद संकेतस्थळावर तपासणी करावी. तसेच अधिकृत ई-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांकावरील एस.एम.एस. तपासत रहावेत.

20/10/21

(दत्तात्रय शिंदे)

पोलीस अधीक्षक, पालघर